**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587



# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे








वर्ष ५ । अंक २७४ । शुक्रवार ३१ जुलै २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


# प्रिन्सिपल विद्यार्थ्याला चावले...

## नालंदा इंग्लिश मीडियम स्कूल येथील गंभीर घटना



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कोणतेही कॉलेज, विद्यालय, महाविद्यालय किंवा स्कूल असो त्या ठिकाणची संपूर्ण जबाबदारी ही प्रिन्सिपलची असते. प्रिन्सिपल वर विश्वास ठेवूनच सर्व पालक आपल्या मुलांना या ठिकाणी शिक्षण घेण्यासाठी पाठवत असतात. प्रिन्सिपल हे या सर्व विद्यार्थ्यांचे रक्षण कर्ते असतात मात्र काही घटना अशा घडतात की, प्रिन्सिपलच विद्यार्थ्यांच्या बाबतीत विचित्र प्रकार करतात. अशीच एक घटना अहिल्यानगर तालुक्यातील एका इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये घडली.

या स्कूलच्या प्रिन्सिपल ने चिडून इयत्ता तिसरीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हाताला चावा घेऊन त्या विद्यार्थ्यांच्या हाताला गंभीर दुखापत केली. या प्रकारामुळे पालक वर्गामध्ये खळबळ उडाली असून गणपतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी, अहिल्यानगर तालुक्यातील वाळुंज गावामध्ये असलेल्या नालंदा इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये सोनल अर्जुन शेळके यांचा मुलगा इयत्ता तिसरी मध्ये शिक्षण घेत आहे. वर्गामध्ये मित्राबरोबर खेळत असताना किरकोळ कारणावरून मित्रा मित्रांमध्ये छोटे-मोठे वाद होतच असतात. असाच वाद शेळके यांच्या मुलाचा मित्र सोबत झाला होता. ही घटना प्रिन्सिपल गौतम यांना समजली त्यांनी इयत्ता तिसरीच्या वर्गामध्ये येऊन शेळके यांच्या मुलाला मारहाण करत त्याच्या गळ्याला ■ पान ४ वर



पद्मशाली समाजच्या पारंपारिक बागुलू पंडुगू सणानिमित्त बागडपट्टी येथील शितळा देवी मंदिर येथे महिलांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. (छाया– राजू खरपुडे, नगर)

# कोळाईदेवी विद्यालयाच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी नितीन नलगे

## उपाध्यक्षपदी हेमंत बडवे

**दैनिक आकर्षण । केशव कातोरे**

**बेलवंडी–** श्रीगोंदा तालुक्यातील कोळगाव येथील रयत शिक्षण संस्थेच्या कोळाईदेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी माजी उपसरपंच नितीन आनंदराव नलगे यांची, तर उपाध्यक्षपदी हेमंत बडवे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

निवड प्रक्रियेवेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक दत्तात्रय मोरे, पर्यवेक्षक संजय ठोकळ तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते. समितीचे माजी अध्यक्ष तथा उद्योगपती अमित लगड यांनी राजीनामा दिल्यानंतर ही निवड करण्यात आली. अमित लगड यांनी अध्यक्षपदाच्या कार्यकाळात विद्यालयातील शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासाठी



तसेच विविध भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या कार्याची उपस्थितांनी प्रशंसा केली.

नितीन नलगे यांच्या निवडीबद्दल माजी मंत्री बबनराव पाचपुते, श्रीगोंदा नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार विक्रमसिंह पाचपुते, कोळगावचे लोकनियुक्त सरपंच, माजी सभापती पुरुषोत्तम लगड, तसेच कोळगाव व पंचक्रोशीतील विविध संस्थांचे पदाधिकारी आणि ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन केले.

**प्रतिक्रिया :**

**''विद्यालयाचा सर्वांगीण विकास, शैक्षणिक गुणवत्ता वृद्धी आणि विद्यार्थ्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्व विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार,'' अशी भावना शालेय व्यवस्थापन समितीचे नवनिर्वाचित अध्यक्ष नितीन आनंदराव नलगे यांनी व्यक्त केली.**

# दरोड्याच्या तयारीतील टोळी शिर्डी रेल्वेस्थानकाजवळून ताब्यात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** गुरुपौर्णिमा उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शिर्डी येथे दरोड्याच्या तयारीत असलेल्या ७जणांच्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली असून, दोघे अंधाराचा फायदा घेऊन फरार झाले.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वाखालील पथक शिर्डी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना शिर्डी ते शिर्डी रेल्वेस्थानक रस्त्यावरील रेल्वे ट्रॅकजवळ काही संशयित इसम दरोडा टाकण्याच्या उद्देशाने थांबल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. पथकाने घटनास्थळी सापळा रचला असता संशयितांनी पळण्याचा प्रयत्न केला, परंतु पोलिसांनी पाठलाग करून सिद्धार्थ जाधव (वय २६), सुशील पवार (वय ३३), विजय गायकवाड (वय १९), एकनाथ मासाळकर (वय ४४), नितीन धोत्रे (वय ३१), लखन मुरकुटे (वय २९) आणि सोमनाथ कुसळकर ■ पान ४ वर

# वेल्हाळे दरोडा प्रकरणी एलसीबीकडून मोक्कातील फरार आरोपीसह तिघे जेरबंद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** संगमनेर तालुक्यातील वेल्हाळे येथे १२ जुलै रोजी पडलेल्या दरोड्या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेने मोक्कातील फरार आरोपीसह तिघांना अटक केली असून, ४ आरोपी अजूनही फरार आहेत.

दिनांक १२ जुलै रोजी रात्री सव्वाबाराच्या सुमारास वेल्हाळे येथील गणेश चव्हाण यांच्या घरी ५ अज्ञात दरोडेखोरांनी प्रवेश केला. त्यांनी चव्हाण यांच्या भावावर कुऱ्हाडीने वार करत कुटुंबाला मारहाण केली आणि सोन्या-चांदीचे दागिने, रोकड व मोबाईल असा एकूण २ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल लुटला. याप्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल ■ पान ४ वर

# माळीवाड्यात शनि मंदिरातील दानपेटी चोरी

## दानपेटीसह साडेसहा हजारांची रोकड लंपास
## सीसीटीव्हीच्या आधारे चोराचा शोध




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहर व परिसरात चोऱ्यांचे प्रमाण वाढत असताना आता चोरट्यांनी थेट देवाच्या दानपेटीवरच डल्ला मारल्याची घटना उघडकीस आली आहे. शहरातील बारातोटी कारंजा परिसरातील केवळ हॉस्पिटलसमोरील शनि महाराज मंदिरातील दानपेटी अज्ञात चोरट्याने चोरून नेली.

याबाबत महेश बाळासाहेब चिंतामणी यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. २९ जुलै रोजी सकाळी पावणेदहा ते दहा वाजण्याच्या सुमारास अज्ञात चोरट्याने मंदिरात प्रवेश करून सुमारे ५०० रुपये किमतीची स्टीलची चौकोनी दानपेटी लंपास केली. या दानपेटीत अंदाजे ६ ते ६.५ हजार रुपयांची रोकड तसेच विविध मूल्यांची नाणी होती. या घटनेमुळे परिसरातील भाविक व नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून, मंदिरांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीची ओळख अद्याप पटलेली नाही. पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार राजेंद्र औटी पुढील तपास करत असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्याचा शोध सुरू आहे.

# जंक फूड नियमांमुळे शाळांबाहेरील खाद्यपदार्थांच्या गाड्यांवर संकट

## तंबाखूजन्य पदार्थाची विक्री जोमात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) शाळा परिसरातील ५० मीटर हद्दीत जंक फूड जाहिरात व खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या गाड्यांवर ( स्टॉल ) बंदी घातली आहे. त्यामुळे शाळांबाहेर वडापाव, समोसा, मिसळ पाव, चायनीज पदार्थ, भेळ यांसारखे खाद्यपदार्थ विकणारे स्टॉलधारक, तसेच शाळांतील उपाहारगृह( कॅन्टीन ) चालक आणि शाळा प्रशासन धास्तावले आहेत. या नियमांमुळे शाळांबाहेरील खाद्यपदार्थांच्या गाडीवर ( स्टॉल ) संकट येण्याची भीती विक्रेते व्यक्त करत आहेत.

अहिल्यानगर शहरातील अनेक नामांकित कॉलेज महाविद्यालय आणि शाळेबाहेरच्या परिसरात विविध जंक फूडची विक्री होत आहे. शाळेतील मुले वडापाववर ताव मारतात, तर महाविद्यालयांतील विद्यार्थी सँडविच, समोसे, वडे, मोमोज अशा पदार्थांवर ताव मारताना दिसतात त्यामुळे स्टॉल धारकांची मोठ्या प्रमाणात विक्री होते.

### जंगफुडवर बंदी मात्र शाळा परिसरात सिगारेट, मावा गुटक्याची सर्रास विक्री

यापूर्वी शाळा परिसरात तंबाखूजन्य पदार्थ मावा, गुटखा, पान मसाला, सिगारेट, विकण्यावर बंदी घालण्यात आली आहे. ही बंदी केवळ कागदोपत्रीच राहिली आहे. या नियमाची अंमलबजावणी प्रशासनाकडून करण्यात यावी यासाठी सिताराम सारडा विद्यालयाचे तत्कालीन मुख्याध्यापक हेरंब कुलकर्णी यांनी तंबाखूजन्य पदार्थ विक्री विरोधात आंदोलन पुकारले होते या आंदोलनात त्यांना शाळा परिसरातील तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणाऱ्यांकडून मारहाण झाली होती. असे असताना सुद्धा आजही अनेक शाळा परिसरात सिगारेट, तंबाखू, मादक पदार्थ सहज उपलब्ध होतात. त्यामुळे ५० मीटर हद्दीचा मुद्दा हास्यास्पद असल्याचे शहरातील नागरिक आणि पालकांकडून सांगण्यात येत आहे.

### ५० मीटरच्या बाहेर सर्व काही जोमात

शाळा परिसरात बंदी असली तरी ५० मीटरच्या बाहेर असलेल्या टपऱ्यांवर हे सर्व पदार्थ विद्यार्थी सहज मिळवून शकतात. सध्या बऱ्याच शाळांच्या मुख्य प्रवेशद्वारापासून ५० मीटरच्या हद्दीबाहेर सिगारेटतंबाखू, मावा गुटखा सहज उपलब्ध होऊ शकतो. त्यामुळे या आदेशांचे असेच होईल का, अशी शंकाही काही पालकांनी व्यक्त केली.शाळामहाविद्यालयांच्या ५० मीटर बाहेर असलेल्या खाद्यपदार्थांच्या गाड्यांचे काय करणार, असा प्रश्न विद्यार्थी आणि पालकांना पडला आहे.

### शहरात अन्न औषध आणि पोलीस प्रशासनाकडून कारवाईचा दिखावा

अहिल्यानगर शहरात मोजक्याच शाळा कॉलेज महाविद्यालय परिसरातील ५० मीटरच्या आत मध्ये तंबाखूजन्य पदार्थ विक्री बंद झालेली आढळून येते मात्र या हद्दीच्या पलीकडे संपूर्ण शहरात मादक पदार्थ तंबाखूजन्य पदार्थ विक्री जोमाने सुरू आहे. या विक्रीच्या विरोधात अन्न औषध आणि पोलीस प्रशासन कठोर कारवाई करताना आढळून येत नाही या कारवाईदरम्यान प्रशासनाची उदासीनता फक्त पहायला मिळत आहे कदाचित कारवाई करू नये म्हणून होणारी आर्थिक तडजोड याला कारणीभूत असू शकते अशी चर्चा अहिल्यानगर शहरातील नागरिक करत आहेत. अन्न औषध प्रशासन विभागाकडे अहिल्या नगर शहरासह जिल्ह्यात कारवाई करण्यासाठी कर्मचारी संख्येचा अभाव असल्याचे कळते. तर दुसरीकडे पोलीसशासनाकडे मुबलक कर्मचारी संख्या असताना सुद्धा त्यांच्यामार्फत आर्थिक तडजोडीमुळे कारवाई करण्यास टाळाटाळ करण्यात येते.

# संभाजीनगर–अहिल्यानगर–पुणे महामार्ग सहापदरी करा

## खासदार नीलेश लंके यांची मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे मागणी । २२० किमी सिमेंट–काँक्रीट रस्ता व आवश्यक ठिकाणी फ्लायओव्हर उभारणीची विनंती

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** खासदार नीलेश लंके यांनी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३-एफ (छत्रपती संभाजीनगर-अहिल्यानगर-शिरूर-पुणे) या सुमारे २२० किलोमीटर लांबीच्या महामार्गाचे सहापदरी सिमेंट-काँक्रीट मार्गात रूपांतर करण्याची मागणी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे. याबाबत त्यांनी नवी दिल्लीत मंत्री गडकरी यांची भेट घेऊन या महत्त्वाच्या मार्गाच्या सर्वांगीण विकासासाठी तातडीने प्रशासकीय मंजुरी देण्याची विनंती केली आहे.

खासदार लंके यांनी या संदर्भात दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पुणे हे राज्यातील औद्योगिक, शैक्षणिक, वैद्यकीय व आध्यात्मिक केंद्र असून मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातून दररोज हजारो नागरिक या मार्गाने प्रवास करतात. मात्र, शिरूर ते छत्रपती संभाजीनगर दरम्यानचा राष्ट्रीय महामार्ग अनेक ठिकाणी अरुंद, खड्डेमय व जीर्ण अवस्थेत असल्याने वाहतूक कोंडी, अपघात आणि प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा



लागत आहे.

शिरूर-पुणे फ्लायओव्हर प्रकल्पाला गती दिल्याबद्दल केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आभार व्यक्त करताना, उर्वरित संपूर्ण महामार्गाचाही विकास त्याच धर्तीवर करण्यात यावा, अशी मागणी खासदार लंके यांनी केली आहे.

या महामार्गावर श्रीक्षेत्र शनिशिंगणापूर, श्री ज्ञानेश्वर माऊली मंदिर (नेवासा), शिर्डी, देवगड, थेऊर गणपती, रांजणगाव गणपती यांसारखी प्रमुख तीर्थक्षेत्रे असून वाळूज, नेवासा, अहिल्यानगर, सुपा, रांजणगाव, शिक्रापूर, चाकण आणि तळेगाव ही महत्त्वाची औद्योगिक

## दै. आकर्षण निवडक

### माजी नगरसेवक यांच्या अतिक्रमणावर कारवाईची मागणी



**अहिल्यानगर-** सिद्धार्थ नगर येथील माजी नगरसेवक दीप चव्हाण यांच्या राहत्या घरावरील अतिक्रमणाची पाहणी करून तत्काळ कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी सम्राट ब्रिगेडच्या वतीने अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी सम्राट ब्रिगेडचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष पवन भिंगारदिवे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.निवेदनात म्हटले आहे की, सिद्धार्थ नगर येथील शिला दीप चव्हाण यांच्या नावे असलेली चाळ क्रमांक २ ही सुमारे ४९.४२ चौरस मीटर क्षेत्रफळाची असून, या जागेवर वाढीव बांधकाम करून अतिक्रमण करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित माजी नगरसेवकांनी त्यांच्या राहत्या घराचेही वाढीव बांधकाम केल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.तसेच, महानगरपालिकेचे अधिकारी अतिक्रमण हटविण्यासाठी गेल्यास संबंधितांकडून दमदाटी केली जाते. ''मी दलित आहे, माझे अतिक्रमण काढल्यास अ‍ॅट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करीन,'' अशी धमकी दिली जात असल्याचाही आरोप निवेदनात करण्यात आला आहे.दीप चव्हाण हे अनुसूचित जातीसाठी राखीव प्रभागातून अनेकवेळा नगरसेवक म्हणून निवडून आल्यामुळे प्रशासनावर राजकीय दबाव येत असल्याचा आरोपही सम्राट ब्रिगेडने केला आहे. त्यामुळे कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता संबंधित जागेची प्रत्यक्ष पाहणी करून नियमांनुसार तातडीने कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणात लवकरात लवकर योग्य ती कारवाई न झाल्यास अहिल्यानगर महानगरपालिकेसमोर तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही सम्राट ब्रिगेडने आपल्या निवेदनातून दिला आहे.

# अहिल्यानगर जिल्हा पेन्शनर असोसिएशनच्या अध्यक्षपदी एन. एम. पवळे; नव्या कार्यकारिणीची एकमताने निवड

### ज्येष्ठ नागरिकांच्या सन्मानासाठी संघटित प्रयत्नांची गरज; नव्या पदाधिकाऱ्यांचा निर्धार



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हा पेन्शनर असोसिएशनची महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीत पुढील तीन वर्षांच्या कालावधीसाठी नवीन कार्यकारिणीची एकमताने निवड करण्यात आली. यावेळी जुनी कार्यकारिणी बरखास्त करून नव्या पदाधिकाऱ्यांवर जबाबदारी सोपविण्यात आली. बैठकीत पेन्शनधारकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली तसेच शासन स्तरावर पाठपुरावा करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

नवीन कार्यकारिणीमध्ये अध्यक्षपदी एन. एम. पवळे, उपाध्यक्षपदी वसंत थोरात व मिलिंद वैद्य, कार्याध्यक्षपदी डी. यू. देशमुख, खजिनदारपदी डी. एम. टेपाळे, सहखजिनदारपदी आर. जी. शेख, चिटणीसपदी आर. के. गावडे तर सरचिटणीसपदी मधुकर खताळ यांची एकमताने निवड करण्यात आली.

याशिवाय सल्लागार म्हणून रमेश शहा, एस. एस. परशुरामी, रवींद्र गणगले, दिलीप पाठक, लक्ष्मण जगताप आणि अन्वर शेख यांची निवड करण्यात आली. कार्यकारिणी सदस्य म्हणून नंदू ढापसे, मुठाळ, सतीश वाघ, पेरणे, अनिल पठाण, वाखारे, नवनाथ भालेराव, वसंत गायकवाड, बाबा डवरे, श्रीमती वाघ, शांताबाई शेकटकर, पेटारेबाई आणि द्वारका किंगर यांची निवड करण्यात आली.

बैठकीत निवृत्त कर्मचारी व पेन्शनधारकांना भेडसावणाऱ्या विविध अडचणी, महागाई भत्ता, आरोग्य सुविधा, कौटुंबिक पेन्शन, कार्यालयीन कामकाजातील विलंब, शासन निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी आणि ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. संबंधित विभागांकडे सातत्याने पाठपुरावा करून पेन्शनरांचे प्रश्न सोडविण्यासाठी संघटना अधिक सक्रियपणे कार्य करेल, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

नवनियुक्त अध्यक्ष एन. एम. पवळे म्हणाले की, अहिल्यानगर जिल्हा पेन्शनर असोसिएशन ही केवळ एक संघटना नसून हजारो निवृत्त कर्मचारी आणि ज्येष्ठ नागरिकांचा विश्वास आहे.

# टाकळी ढोकेश्वर वासुंदे चौकात काळाचा घाला

### बोलेरो पिकअपच्या भीषण अपघातात एकाचा मृत्यू, सहाजण जखमी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पारनेर–** पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील वासुंदे चौकात बुधवारी (दि. २९ जुलै) रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास बोलेरो पिकअप (क्र. एमएच १५ जेडब्ल्यू २८०४) वाहनाचा भीषण अपघात होऊन एका युवकाचा मृत्यू झाला, तर सहा जण गंभीर जखमी झाले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बोलेरो पिकअप वाहनातून काही कामगार प्रवास करत असताना वासुंदा चौकातील धोकादायक असलेल्या वळणावर गाडीचा ताबा सुटून अपघात झाला. अपघात इतका गंभीर होता की वाहनातील अनेक जण जखमी झाले. स्थानिक नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत जखमींना बाहेर काढून उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यास मदत केली. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि आपत्कालीन यंत्रणा घटनास्थळी दाखल झाल्या. या अपघातात तुषार भगवान भोसले (वय ३०, रा. दुबेर, ता. सिन्नर, जि. नाशिक) यांचा मृत्यू झाला. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. अपघातात सुनील रामदास बोडके (रा. नाशिक), रवी कैलास शिंदे (रा. शिंदेगाव, जि. नाशिक), रविराज पाटील (रा. कर्नाटक), सोनू इंद्रबहादुर सिंग (रा. उत्तर प्रदेश), राम गंगाराम रच्छा (रा. उत्तर प्रदेश) आणि कांतीलाल प्रभाकर गांगुर्डे (रा. पंचकेश्वर, ता. निफाड, जि. नाशिक) हे जखमी झाले आहेत. त्यांच्यावर उपचार सुरू असून त्यांच्या प्रकृतीबाबत वैद्यकीय निरीक्षण ठेवण्यात आले आहे. अपघाताचे नेमके कारण अद्याप समोर आले नसून वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ही दुर्घटना घडली असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र, याबाबत अधिकृत माहिती तपासानंतरच स्पष्ट होणार आहे. या प्रकरणी पोलीस निरीक्षक संतोष खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पोपट रोकडे पुढील तपास करीत आहेत. अपघाताचे कारण, वाहनाचा वेग आणि इतर तांत्रिक बाबींची चौकशी सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# गुरुदत्त भक्तीधाम मंदिरात गुरुपौर्णिमा उत्सव साजरा



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** भारतीय संस्कृतीत गुरु शिष्य परंपरा महान आहे.संत किसनगिरी नगर येथे भगवान श्री दत्तात्रयाच्या पावनभूमीत प्रातःस्मरणीय समर्थ सद्गुरु किसनगिरी बाबा यांच्या आशीर्वादाने तसेच हभप भास्करगिरी महाराज यांच्या प्रेरणेने गुरु पौर्णिमेचा उत्सव साजरा होत आहे.गुरु महिमा अपरंपार आहे.

गुरुपौर्णिमा उत्सव हा गुरुंविषयी कृतज्ञता भाव व्यक्त करण्याचा सोहळा आहे. गुरूंच्या मार्गदर्शनाने जीवनातील अंधकार दूर होतो.मानवाच्या कल्याणासाठी सद्गुरूंची कृपा असणे आवश्यक आहे. असे निरूपण देवगड देवस्थानचे उत्तराधिकारी परमपूज्य श्री स्वामी प्रकाशानंद गिरीजी महाराज यांनी केले आहे.

पाइपलाईन रोड, संत किसनगिरीनगर येथील गुरु दत्त भक्तीधाम मंदिरामध्ये गुरु पौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त भगवान श्री दत्तात्रयांचे महाआरती करण्यात आली. तसेच देवगड देवस्थानचे उत्तराधिकारी प.पु. स्वामी श्री प्रकाशानंदगिरीजी महाराज यांनी उपस्थित भाविकांना मार्गदर्शन केले.याप्रसंगी आर्थिक गुन्हे शाखेचे डीवायएसपी गणेश उगले, कवी दत्तात्रय वारकड, नगरसेवक सागर बोरुडे ,श्री गडाख आदींसह श्री समर्थ सद्गुरु किसनगिरीबाबा नगर भक्त मंडळाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाआरतीनंतर भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

# शिक्षकांनी आपले मानसिक आरोग्य चांगले ठेवणे हे आनंददायी शिक्षण देण्यास पोषक ठरेल : सौ ज्योती केसकर

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शिक्षकांचे मन निरोगी, सकारात्मक आणि संवेदनशील असेल, तर त्यांच्या ज्ञानदानाच्या कार्यात रचनात्मक बदल घडून येतात आणि त्याचा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर सकारात्मक परिणाम होतो असे प्रतिपादन प्रमुख अतिथी सौ. ज्योती केसकर यांनी केले.

समर्थ विद्या प्रसारक मंडळ संचलित श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला, प्राथमिक विभाग येथे आयोजित गुरुपौर्णिमा उत्सव कार्यक्रमात त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या. यावेळी त्यांनी शिक्षक हे केवळ ज्ञानदान करणारे नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करणारे शिल्पकार असल्याचे सांगितले. प्रत्येक विद्यार्थ्याला सुसंस्कारित, जबाबदार आणि आदर्श नागरिक म्हणून घडविण्याची मोठी जबाबदारी शिक्षक समर्थपणे पार पाडत असतो, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते व्यासप्रतिमेच्या



पूजनाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गुरूवंदनेने सर्वांची मने जिंकली. प्रशालेच्या संगीत शिक्षक सौ खणकर यांनी सादर केलेल्या गुरूस्तवनाने संपूर्ण वातावरण भक्तिरसाने भारावून गेले.

प्रशालेच्या मुख्याध्यापक सौ गुंफेकर यांनी आपल्या प्रास्ताविकात गुरुपौर्णिमेचे महत्त्व सांगताना, ''आई ही पहिली गुरू, वडील हे जीवनाचे मार्गदर्शक आणि शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे शिल्पकार आहेत. गुरुंचा आदर, आई–वडिलांचा सन्मान आणि चांगल्या संस्कारांचे पालन हीच खरी गुरुदक्षिणा आहे,'' असा मोलाचा संदेश विद्यार्थ्यांना दिला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय समितीचे चेअरमन मा. श्री. सुरेश क्षीरसागर हे होते तसेच तसेच श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळ चेअरमन श्री विकास सोनटक्के व कार्यकरिणी सदस्या सौ संध्या कुलकर्णी यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा द्विगुणीत झाली.

याप्रसंगी विविध इयत्तांतील विद्यार्थ्यांनी गुरूंप्रती असलेला आदर, प्रेम आणि कृतज्ञता व्यक्त करणारी मनोगते सादर केली. तसेच जेष्ठ शिक्षक श्री. बाबासाहेब वाव्हळ यांनी आपल्या मनोगतातून गुरू–शिष्य नात्याचे महत्त्व विशद केले.

### गुरुजनांचा गौरव, संस्कारांचा उत्सव

# सेंट विवेकानंद प्रायमरी स्कूलमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** सिंधी एज्युकेशन सोसायटी संचलित सेंट विवेकानंद प्रायमरी स्कूल येथे गुरुपौर्णिमेचा उत्सव अत्यंत भक्तिभाव, उत्साह आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. भारतीय संस्कृतीतील गुरु–शिष्य परंपरेचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविण्यासाठी इयत्ता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांतर्फे, मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा व शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित पालक, शिक्षक यांचे स्वागत व गुरु वंदनेने झाली. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा श्रीफळ देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

यानंतर शर्वरी धाने आणि राजसी कुलकर्णी या विद्यार्थिनीने गुरुपौर्णिमेचे महत्त्व या विषयावर प्रभावी भाषण सादर केले. आणि तन्मई ब्रम्हे ने संस्कृत मध्ये श्लोक सादर केले. व मनस्वी खेडकर हिने कविता सादर केली, विद्यार्थ्यांनी गुरुभक्तीपर गीत, प्रेरणादायी भाषण, संस्कृत श्लोक, कविता तसेच '' '' ही मूल्यशिक्षणावर आधारित नाटिका सादर करून उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर आकर्षक नृत्य सादरीकरणाने कार्यक्रमात अधिक रंगत आली.

कार्यक्रमात शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत गुरुंचे जीवनातील अनन्यसाधारण स्थान, शिक्षकांप्रती आदरभाव आणि संस्कारांचे महत्त्व अधोरेखित केले.

याप्रसंगी बोलताना शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा म्हणाल्या की,''ज्ञान हेच खरे सामर्थ्य आहे.'' मोबाईल, इंटरनेट आणि आधुनिक साधनांमुळे माहिती सहज मिळते, पण योग्य ज्ञान आणि मूल्ये गुरुच देऊ शकतात. त्यामुळे आपल्या शिक्षकांचा आदर करा, त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ घ्या आणि शिकण्याची वृत्ती कायम ठेवा.

जीवनात यशस्वी व्हायचे असेल, तर तीन गोष्टी लक्षात ठेवा शिस्त, परिश्रम आणि सातत्य. अपयश आले तरी खचू नका, कारण अपयश हे यशाकडे नेणारे पाऊल असते. आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करा आणि स्वतःवर विश्वास ठेवा.आजचा हा पवित्र दिवस गुरुपौर्णिमा आपल्या जीवनातील सर्वात महत्त्वाच्या नात्याची आठवण करून देतो, ते म्हणजे गुरु–शिष्य नाते. गुरु शिष्याच्या नात्याची महती त्यांनी छोटीशी गोष्ट सांगून केली.. गुरु म्हणजे केवळ ज्ञान देणारी व्यक्ती नाही, तर अज्ञानातून ज्ञानाकडे, अंधारातून प्रकाशाकडे आणि चुकीच्या मार्गावरून योग्य मार्गावर नेणारा खरा मार्गदर्शक असतो.

तसेच शाळेच्या प्राचार्या गीता तांबे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले . त्या म्हणाल्या ,आजच्या युगात माहितीची कमतरता नाही, पण योग्य दिशेची गरज आहे. ही दिशा तुम्हाला तुमचे गुरु देतात. त्यामुळे गुरुंचा आदर करा, त्यांचं ऐका आणि त्यांच्या प्रत्येक शब्दातून काहीतरी शिकण्याचा प्रयत्न करा.लक्षात ठेवा यश एकाच दिवसात मिळत नाही. त्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न, शिस्तबद्ध जीवन आणि सकारात्मक विचार आवश्यक असतात. अपयश आलं तर निराश होऊ नका, कारण प्रत्येक अपयश तुम्हाला काहीतरी शिकवून जातं. जो विद्यार्थी अपयशातून शिकतो, तोच खऱ्या अर्थाने यशस्वी होतो.

## शब्दकोडे क्रमांक : १८



**आडवे शब्द :** १. महाराष्ट्राची राजधानी ३. फुलांचा राजा ५. भारताचे राष्ट्रीय फुल ७. जननी ८. प्रचार, पसरणे या अर्थी ९. संगीत सप्तकातील अखेरचा स्वर १०. बुद्धिबळातील एक महत्वपूर्ण सोंगटी ११. पाण्याने भरलेले माठ जे तराजूप्रमाणे वाहून नेले जातात १२. हिंदीत-चिंच १३. समेट १८. दैना १९. प्राण्यांच्या मागे असते २०. सध्या पदावर विराजमान नसलेला २१. वातावरणातील कण २३. हिंदीत - बोबडा २४. विषम-विरुद्ध २५. वका - उलट लिहा २६. शेळीचे वा मेंढीचे पिल्लू २७.एक लाख आणि पंचवीस हजार मिळून तयार होणारी संख्या ३०. तीन दशकांची संख्या ३२. पिकनिक ३३. दुधावरील मलई ३४. स्थानिक कला ३८. गोदाम ३९. बंध ४१. दादर ४३. प्रजा ४४.देह ४५. फांदी ४६. एखाद्या प्रमाणे हुबेहूब केलेली हावभाव ४७. संथ ४८. रान

**उभे शब्द :** १. लग्नात वधू-वर डोक्याला बांधतात २. एकावर एक इमले रचून तयार केलेली वास्तू ४. झाडांची केलेली जपणूक ४. खाटीक ६. अविरत उपसलेले कष्ट ११.एक हिंदी सिने अभिनेत्री १४. पालघर जिल्ह्यातील एक स्थानक १५. वीज १६. आईची आई १७.एक देवीचे नाव १७. महाराष्ट्राचा अधिकृत राज्यप्राणी २०. बाब २२.एक हिंदी सिने अभिनेत्री २३. उगाचच २४. प्रश्न २७. करण्यास सोपे २८. फळ्यावर ज्याने लिहितात ती वस्तू २९. साधारण नसलेले ३१. मैत्री ३५. तळहात ३६.तांबडा ३७. पद ३८. देश ४०. घट्ट ४१. पाळलेला ४२. रिकामा

### शब्दकोडे क्रमांक : १७ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भा | र | त | | पु | डा | | भो | ग | दा | | वे |
| त | | ला | ड | का | | स | पा | ट | | आ | ता |
| | का | ठी | | र | सा | त | ळ | | ज | व | ळ |
| वा | रा | | घी | | र | त | | ब | ग | ळा | |
| | वा | घ | | र | ण | | प | र | त | | ग |
| खा | स | | अं | ग | | फ | र | क | | म | ज |
| न | | द | | डा | वा | | व | त | न | दा | र |
| दा | र | बा | न | | ल | बा | ड | | का | न | |
| न | | व | | स | | रा | | सा | र | | बा |
| | वि | | स | व | त | | रा | धा | | सू | र |
| आ | का | र | | ल | ग | ब | ग | | न | | दा |
| त | र | त | री | त | | ल | | आ | वे | द | न |

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### ॲड. चेतना डुंगरवाल यांचे उद्योजकांना कायदेशीर मार्गदर्शन

अहिल्यानगर - जैन आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना प्रोफेशनल फोरम, अहिल्यानगर चॅप्टरच्या वतीने नुकताच नगरमध्ये अर्थ ७ येथे प्रोटेक्ट व्हॉट यू बिल्ड या विषयावर उद्योजकांसाठी विशेष कायदेशीर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते.



या सत्राला स्थानिक उद्योजकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमासाठी द लीगल लॅबच्या संस्थापक ॲड. चेतना ओस्तवाल-डुंगरवाल प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या. ॲड. चेतना या वांबोरी येथील उद्योजक श्री. राजकुमार ओस्तवाल यांच्या कन्या असून त्यांनी आतापर्यंत ४५० हून अधिक ट्रेडमार्क नोंदणी, चित्रपटांच्या स्क्रिप्टचे कॉपीराइट तसेच नामांकित कलाकारांचे व्यावसायिक करार यशस्वीरीत्या हाताळले आहेत. आपल्या मार्गदर्शनात ॲड. चेतना यांनी ट्रेडमार्क, पेटंट, कॉपीराइट नियम, व्यावसायिक करार आणि कायदेशीर अनुपालन या विषयांवर विविध उदाहरणांसह सखोल आणि सोप्या भाषेत माहिती दिली. व्यवसायाची उभारणी करतानाच बौद्धिक संपदेचे रक्षण करणे किती महत्त्वाचे आहे, हे त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमास जीटोचे चेअरमन आलोक मुनोत, चीफ सेक्रेटरी तुषार कर्नावट आणि अजय मुथा यांच्यासह अनेक मान्यवर व व्यावसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सत्रातील माहितीमुळे उद्योजकांना आपल्या व्यवसायातील कायदेशीर बाबी समजून घेण्यास मोठी मदत झाली. अशा प्रकारच्या मार्गदर्शनपर कार्यक्रमांचे आयोजन नियमितपणे केले जावे, अशी अपेक्षा उपस्थितांनी व्यक्त केली.

### भारतीय बौद्ध महासभा अहिल्यानगर शहर शाखेच्या वतीने वर्षावास प्रवचन मालिकेची सुरुवात

अहिल्यानगर- भारतीय बौद्ध महासभा, अहिल्यानगर शहर शाखेच्या वतीने वर्षावास प्रवचन मालिका २०२६ ची सुरुवात सावेडी गाव येथील बुद्ध विहारात उत्साहात करण्यात आली. कार्यक्रमात त्रिसरण, पंचशील ग्रहण आणि बुद्धपूजेनंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे यांनी वर्षावास प्रवचन मालिकेची अधिकृत घोषणा केली. प्रमुख प्रवचनकार तथा महिला जिल्हाध्यक्षा सुनीताताई गायकवाड यांनी 'तथागत भगवान गौतम बुद्ध विश्वधम्मगुरू' या विषयावर मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या, ''आषाढी पौर्णिमेच्या दिवशी भगवान गौतम बुद्धांनी पंचवर्गीय भिक्खूंना प्रथम धम्मोपदेश देऊन संघाची स्थापना केली. त्यामुळे बौद्ध जगतात आषाढी पौर्णिमेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. भगवान बुद्धांनी मानवजातीला दिलेला पंचशीलाचा मार्ग हा शांतता, समता आणि मानवकल्याणाचा मार्ग आहे. प्रत्येकाने आपल्या जीवनात पंचशीलाचे पालन करण्याचा संकल्प केला तर संपूर्ण मानवजातीचे कल्याण साध्य होईल.

## श्री ढोकेश्वर महाविद्यालयात बीसीए अभ्यासक्रमाला मान्यता; ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी आयटी क्षेत्राची नवी दालने खुली



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी आनंदाची बातमी म्हणजे श्री ढोकेश्वर महाविद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथे शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासून बॅचलर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स या रोजगाराभिमुख पदवी अभ्यासक्रमास मान्यता प्राप्त झाली आहे. या मान्यतेमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संगणक व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील उच्च दर्जाचे शिक्षण आपल्या परिसरातच उपलब्ध होणार आहे.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या अध्यक्ष मा. श्री. रामचंद्रजी दरे साहेब, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव श्री. मुकेशदादा मुळे, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त मा. श्री. सीताराम खिलारी तसेच सर्व पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शन व प्रयत्नांमुळे हा नवीन अभ्यासक्रम महाविद्यालयात सुरू करण्यास मान्यता मिळाली आहे.

आजच्या डिजिटल युगात माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. बीसीए अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रोग्रामिंग, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, वेब डिझाईन, डेटाबेस मॅनेजमेंट, कृत्रिम बुद्धिमत्ता (), सायबर सुरक्षा आणि विविध आयटी क्षेत्रातील आधुनिक कौशल्यांचे शिक्षण मिळणार असून, रोजगार व उद्योजकतेच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव एस. मतकर यांनी या मान्यतेबद्दल संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे आभार मानत विद्यार्थी व पालकांना या अभ्यासक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व रोजगाराभिमुख शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या महाविद्यालयाच्या ध्येयपूर्तीत हा अभ्यासक्रम महत्त्वाचा टप्पा ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या नवीन अभ्यासक्रमास मान्यता मिळाल्याबद्दल महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी व पालकांनी समाधान व्यक्त करून संस्थेचे पदाधिकारी आणि महाविद्यालयाचे अभिनंदन केले. लवकरच बीसीए अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेस प्रारंभ होणार असून, इच्छुक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाशी संपर्क साधून प्रवेशाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

## संजीवनी कॉलनीत खंड्या किंगफिशर पक्ष्याचे दर्शन

### समृद्ध जैवविविधतेचे सकारात्मक संकेत



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रेल्वे स्टेशन – मल्हार चौक परिसरातील संजीवनी कॉलनीच्या ओपनस्पेसमध्ये खंड्या म्हणजेच किंगफिशर पक्ष्याचा मुक्त संचार आढळला असून पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील असलेला हा पक्षी आढळणे म्हणजे कॉलनीतील समृद्ध जैवविविधतेचे सकारात्मक संकेत मिळत असल्याची माहिती हरीभुमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभय ललवाणी यांनी दिली.

दोन वर्षांपूर्वी शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या स्थानिक विकास निधीतून कॉलनीतील ओपनस्पेसला संरक्षक भिंत बांधण्यात आली होती. त्यानंतर पक्षी संवर्धनाच्या हेतूने चेरी फळांची ०९ व शंखासुराची १८ झाडे लावण्यात आली होती. त्यांची उत्तमपणे वाढ सुरू असून मोठ्या प्रमाणात चेरीची फळे व शंखासुराची फुले बहरू लागली आहेत.

त्यामुळे येथे विविध प्रकारचे पक्षी व फुलपाखरे मुक्तपणे संचार करत आहेत. परिसराला बर्ड पार्कचे स्वरूप प्राप्त झाले असून ही बाब कॉलनीतील पर्यावरणीय समतोल व समृद्ध जैवविविधतेचे महत्त्वपूर्ण द्योतक मानली जाते. पक्षी संवर्धनासाठी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार आणखी प्रयत्न करण्यात येणार आहेत. ओपनस्पेस हरीत व विकसित करण्यासाठी कॉलनीतील जेष्ठ सदस्य श्रीकृष्ण लांडगे यांचे मार्गदर्शन व देखभालीसाठी कॉलनीतील सदस्य राजेंद्र बळे व पंकज शिपणकर यांचे सहकार्य लाभत असल्याचे अभय ललवाणी यांनी सांगितले.

### गुरुपौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल आणि मेडिकल कॉलेज, अहिल्यानगर येथे

## नेत्ररोग विभागात अत्याधुनिक उपचारपद्धतीचा शुभारंभ



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** गुरुपौर्णिमेच्या पावन निमित्ताने डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल अँड मेडिकल कॉलेज, अहिल्यानगर येथील नेत्ररोग विभागामध्ये रुग्णांसाठी ॲम्निओटिक मेम्ब्रेन ट्रान्सप्लांट ही अत्याधुनिक उपचारपद्धती सुरू करण्यात आली आहे. नेत्ररोग विभागप्रमुख डॉ. अरुंधती पांडे यांनी पुढाकार घेऊन रुग्णांच्या हितासाठी हा उपक्रम यशस्वीपणे अंमलात आणला. या उपचारपद्धतीमुळे कॉर्नियावरील जखमा, अल्सर, रासायनिक भाजणे आणि नेत्रपटल तसेच इतर गंभीर नेत्रविकारांवरील उपचार अधिक प्रभावीपणे करता येणार असून रुग्णांना दर्जेदार व आधुनिक आरोग्यसेवा उपलब्ध झाली आहे.

ही अत्याधुनिक सेवा मा. डॉ. श्री. सुजय विखे पाटील व डॉ. अभिजित दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आली आहे. तसेच ब्रिगेडियर डॉ. अरूण त्यागी सर, डॉ. देशपांडे सर, डॉ. सतीश मोरे सर आणि डॉ. प्रसाद काजळे सर यांच्या भक्कम पाठिंबा, मार्गदर्शन व सहकार्यामुळे ही सेवा यशस्वीपणे सुरू करणे शक्य झाले. या उपक्रमासाठी प्रसूती व स्त्रीरोग विभागाने मोलाचे सहकार्य केले. विशेषतः डॉ. उर्मिला गवळी व डॉ. सुहास शिंदे यांनी साठी आवश्यक असलेल्या ॲम्निओटिक मेम्ब्रेनचे संकलन करण्यामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. नेत्ररोग विभागाने सुरू केलेल्या या अत्याधुनिक उपचारपद्धतीमुळे अहिल्यानगर तसेच परिसरातील रुग्णांना मोठ्या शहरांमध्ये न जाता स्थानिक पातळीवरच जागतिक दर्जाची नेत्रसेवा उपलब्ध होणार असून, हा आरोग्यसेवेच्या दृष्टीने एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

## गुरुमुळेच विद्यार्थ्यांची जडणघडण होते - ॲड. बाबासाहेब खिलारी

### विद्यालयात गरीब होतकरू विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्य. विद्यालयात, गुरुपौर्णिमा उत्सव व अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, या संस्थेचे माजी सचिव कै. गणपतराव राजाराम उर्फ रावसाहेब म्हस्के यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. याप्रसंगी विद्यालयाचे मार्गदर्शक ॲड. बाबासाहेब खिलारी पा. तथा नाना यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते पुढे म्हणाले की, गुरुपौर्णिमा म्हणजेच व्यास पौर्णिमा या दिवशी महर्षी व्यास यांचा जन्म झाला. आजच्या दिवशी विद्यार्थी आपल्या गुरु विषयी आदर व्यक्त करतात. गुरु अंधाराकडून प्रकाशाकडे नेत असतो. गुरुमुळेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व जडणघडण होत असते. आपल्याला कोणत्या ना कोणत्या मार्गाने मार्गदर्शन करणारा समाजातील प्रत्येक घटक आपला गुरु आहे. आपल्याला मार्ग दाखविणारा मैलाचा दगड ही आपला गुरुच होय.



कार्यक्रमाच्या सुरुवातीस महर्षी व्यास व संस्थेचे माजी सचिव कै. रावसाहेब म्हस्के यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. संस्थेचे माजी सचिव कै. रावसाहेब म्हस्के यांच्या पुण्यतिथी निमित्त बोलताना, ॲड. खिलारी यांनी सांगितले की, रावसाहेब पाथर्डी तालुक्याचे आमदार होते. जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी भरीव काम केले. संस्थेची अनेक शाळा, कॉलेज उभी करून त्यांनी अहिल्यानगर जिल्ह्यात शिक्षणाचा पाया मजबूत केला.

याप्रसंगी माजी मुख्याध्यापक प्रकाश इघे, विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब खिलारी, ह.भ.प. प्रेमानंद महाराज आंबेकर, अविनाश भालके, निलेश जासूद यांनी आपल्या भाषणातून गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या व रावसाहेब म्हस्के यांचे कार्याविषयी माहिती सांगितली. विद्यार्थ्यांच्या झालेल्या भाषणांतून कु. प्रियल झावरेच्या भाषणाला विद्यार्थ्यांनी खूप दाद दिली.

विद्यालयात गणवेश वाटप:– आजच्या कार्यक्रमात विद्यालयाच्या वतीने गरीब व होतकरू ८० विद्यार्थ्यांना मोफत गणवेशाचे वाटप मान्यवरांचे शुभहस्ते करण्यात आले. तसेच विद्यालयातून नुकतेच सेवानिवृत्त झालेले मल्हारी वाघस्कर सर यांच्या वतीने इयत्ता पाचवी मध्ये शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झालेल्या पंचवीस विद्यार्थ्यांना तीन हजार रुपयांचे रोख बक्षिसाचे वाटप करण्यात आले. आजच्या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांनी वर्गशिक्षकांच्या मार्गदर्शनातून केले केले. दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांचा गुलाब पुष्प, पेन देऊन सत्कार केला. कार्यक्रम संपल्यानंतर पाहुण्यांच्या शुभहस्ते विद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लहूशेठ जाधव, उच्च माध्यमिक विभागाचे समन्वयक अशोक गांगड, मल्हारी वाघस्कर, अनिता म्हस्के मॅडम, भाऊसाहेब हिंगडे, होरणे भाऊसाहेब सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे, बाबासाहेब जाधव, अतुल सैद, सुरेखा ठाणगे, प्रिया डव्हणे, भाऊसाहेब बांबेरे, नारायण हरेल, इयत्ता दहावी अ व ब चे सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री. बाळासाहेब निवडुंगे सर यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

## एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीच्या ५० व्या राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेने रचला इतिहास

### हजारो विद्यार्थ्यांच्या दिमाखदार सहभाग; चार दशकांच्या शैक्षणिक कार्याचा सुवर्णमहोत्सवी टप्पा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या युगात विद्यार्थ्यांमध्ये तार्किक विचार, गणितीय कौशल्य आणि बौद्धिक क्षमता विकसित करणे ही काळाची गरज आहे. एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीने गेल्या ४३ वर्षांपासून अबॅकसच्या माध्यमातून महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थ्यांमध्ये गणिताची गोडी निर्माण केली आहे. ५०व्या राष्ट्रीय स्पर्धेचे यशस्वी आयोजन ही केवळ स्पर्धा नसून भारतीय शैक्षणिक क्षेत्रासाठी प्रेरणादायी चळवळ आहे. अकॅडमीने जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय स्तरावर अभिमानाने उंचावले आहे.''असे प्रतिपादन आमदार अमोल खताळ यांनी केले.



एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीच्या ५०व्या राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्याप्रसंगी श्री खताळ बोलत होते. यावेळी परीक्षा उत्तीर्ण कु. ऋतुजा गायकवाड, अधिव्याख्याता डॉ. गणेश मोरे, पोलीस उपनिरीक्षक विद्या झाडे,ॲड. मिनल देशमुख, केंद्रप्रमुख आशा घुले, विश्वनाथ खिल्लारी, रोहिणी खतोडे, मुख्याध्यापक गायकवाड, सुनीता वाकचौरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन, दीपप्रज्वलन आणि अबॅकस मण्यांच्या पवित्र पाटीच्या पूजनाने झाली. त्यानंतर सर्व मान्यवरांचा अकॅडमीच्या वतीने सन्मान करण्यात आला. वंदना थोरात यांनी स्वागत व प्रास्ताविकातून एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीचा ४३ वर्षांचा प्रेरणादायी शैक्षणिक प्रवास, विद्यार्थी घडविण्याची परंपरा आणि राष्ट्रीय स्तरावरील उल्लेखनीय यशाचा आढावा मांडला.या प्रसंगी अबॅकस विषयातील जगातील पहिली पीएच.डी. प्राप्त करणाऱ्या अकॅडमीच्या मार्गदर्शिका डॉ.सौ. कल्पना अशोक घडेकर–कार्ले यांचा विशेष गौरव करण्यात आला. कार्यक्रमातील सर्वात आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरलेल्या अबॅकस डेमो प्रात्यक्षिकात हजारो विद्यार्थ्यांनी अवघ्या काही क्षणांत अवघड गणिती उदाहरणे सोडवून उपस्थितांना अचंबित केले. विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती, एकाग्रता, वेग आणि गणितीय अचूकता पाहून उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.

एव्हरेस्ट आदर्श शिक्षिका पुरस्काराने रोहिणी शिंदे व वैशाली साळुंखे,एव्हरेस्ट स्टार टीचर अवॉर्डने ननिका थोरात, रायझिंग वुमन स्टार अवॉर्डने विद्या देशमुख, तर एव्हरेस्ट गॅलेक्सी टीचर अवॉर्डने वंदना थोरात यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

लहान गटामध्ये वेदश्री पाटील, देवांश बेडवाल, श्रेया गाडगे, प्रतीक भोसले, ऋषिकेश गीते, मानसी इरांडे, शौर्य पोदार, गार्गी दाभाडे, श्लोक शिंदे, आरोही शेळके, शार्विल कवडे, आर्यन लांडे, जय गाडगे, वेदांत वाडिया, कस्तुरी माने, वैभवी कोरडे आणि कृष्णा दिघे यांनी चॅम्पियनशिप पटकावली.मोठ्या गटात सर्वज्ञ वाळे, आराध्या तरहाळ, शिवम देशमुख, अपेक्षा एरंडे, कस्तुरी आरोटे, वेदांत सौर, स्वरांगी हसे, आराध्या वर्पे, अवनी मरकड, इशिता गडाख, स्वरा गुंजाळ आणि अमिरा शेख यांनी उत्कृष्ट यश संपादन करत विजेतेपद पटकावले.

अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यांसह विविध भागांतून आलेले शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त उपस्थितीमुळे संपूर्ण परिसरात शैक्षणिक उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते. शिस्तबद्ध नियोजन, भव्य आयोजन आणि दर्जेदार व्यवस्थापनामुळे उपस्थित मान्यवरांनी एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीच्या कार्याचे विशेष कौतुक केले.

## प्रियदर्शनी शाळेत गुरुपौर्णिमा उत्सव आणि ध्वजसंचालन सोहळा उत्साहात साजरा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महर्षी व्यास यांच्या स्मरणार्थ गुरुपौर्णिमा साजरी केली जाते. गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून आज शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे ध्वजसंचालन आणि बॅजेस प्रदान करण्याचा सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उमेश परदेशी (पीएसआय, पोलीस मुख्यालय अहिल्यानगर), राहील शेख (सायबर एक्स्पर्ट, पोलीस मुख्यालय, अहिल्यानगर) उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवराच्या हस्ते महर्षी व्यास यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये गुरुंविषयी आदर आणि ध्येयप्राप्तीसाठी गुरूंचा आशीर्वाद खूप महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन श्री. परदेशी यांनी केले, तसेच राहील शेख यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सायबर गुन्हेगारीपासून दूर राहणे आवश्यक असल्याचे सांगितले तसेच पोस्को ॲक्ट बद्दल सविस्तर असे मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांच्या दिमाखदार अशा ध्वज संचलनाने मान्यवरांना मानवंदना देण्यात आली व त्यांच्या हस्ते मतदानाने निवडलेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनी प्रतिनिधींना बॅजेस प्रदान करण्यात आले.विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना माननीय श्री परदेशी साहेब यांनी विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये भविष्यात यशस्वी होण्यासाठी आणि ध्येय व लक्ष निश्चित करण्यासाठी एकाग्रता, मैदानी खेळ, शारीरिक व्यायाम, संतुलित आहार, आणि अभ्यास व कष्ट हे आवश्यक असते, तसेच गुन्हेगारी प्रवृत्ती आणि मोबाईलपासून दूर राहण्याचा मौलिक सल्ला देखील दिला.

याप्रसंगी अध्यक्ष बाळासाहेब खोमणे, शाळेच्या प्राचार्या श्रीमती अंजली बोधक, उपप्राचार्य अमोल घोरपडे, पर्यवेक्षिका अनिता थापा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व क्रीडा शिक्षक उपस्थित होते.

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पारनेर यांचे कार्यालय ता. पारनेर, जिल्हा अहिल्यानगर**

फोन नं. ०२४८८–२२१५२८ ईमेल आर.डी.tahasildargarner@gmail.com
क्रं. कावि/अभिलेखा/२५/२०२५ पारनेर दि. ५/२/२०२६

**जाहीर प्रगटन प्रसिद्ध करणेबाबत**

**(जन्म– मृत्यूची नोंदी सुधारणा अधिनियम २०२३)**

अर्जदार श्रीमान/श्रीमती सोयब छोटूभाई हवलदार, रा. टाकळीढोकेश्वर, रा. पारनेर, जि. अहिल्यानगर यांचे तहसील कार्यालय, पारनेर येथे त्यांच्या स्वतःच्या जन्म–मृत्यू नोंद घेणेकामी अर्ज सादर केला आहे.
त्यानुषंगाने संबंधित अर्जदार विरूध्द ग्रामपंचायत कार्यालय टाकळीढोकेश्वर नगर पंचायत कार्यालय यांचे जाहीर प्रगटन आपल्या दैनिकात प्रसिद्ध करणचयासाठी पाठवित आहोत. तसेच मा. सचिव (१) महाराष्ट्र शासन यांचेकडील रा. नि. क्रमांक नमुनो २०२५ / (ई.ऑ. ९९१११८१) ---- दि. २.०३.२०२५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये जाहीर प्रगटन हे अर्जदाराच्या खर्चाने प्रसिद्ध करणेकामीचा खर्च स्वीकारण्यात यावा. तसेच जाहीर प्रगटन प्रसिद्ध करण्याबाबतची कोणतीही जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही. व प्रसिद्ध केलेले जाहीर प्रगटनाबाबतेचे दोन पेपर या कार्यालयास पठाविण्यजात यावे.

सही/–
**तहसीलदार तथा**
कार्यकारी दंडाधिकारी, पारनेर

# रावसाहेब म्हस्के यांचे चरित्र आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी– प्रा. टी. एन. दहातोंडे

**कै. ग. रा. तथा रावसाहेब म्हस्के यांच्या पुण्यतिथीनिमित्त गरजू विद्यार्थ्यांना गणवेश वाटप; शिक्षण, सहकार व समाजकार्यातील कार्याला अभिवादन**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे माजी सचिव, शिक्षण, सहकार व सामाजिक क्षेत्रातील दूरदृष्टीचे नेतृत्व लाभलेले कै. ग. रा. तथा रावसाहेब म्हस्के यांच्या पुण्यतिथीनिमित्त रेसिडेन्शिअल हायस्कूलमध्ये बुधवारी भावपूर्ण वातावरणात अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी रावसाहेबांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. तसेच विद्यार्थी–सेवक कल्याण संस्थेच्या वतीने होतकरू व गरजू विद्यार्थ्यांना गणवेशांचे वितरण करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सह सेक्रेटरी श्री मुकेश मुळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून रेसिडेन्शिअल हायस्कूलचे माजी प्राचार्य प्रा. टी. एन. दहातोंडे उपस्थित होते. तसेच संस्थेचे अध्यक्ष श्री रा. ह. दरे, संस्थेच्या खजिनदार श्रीमती दीपलक्ष्मी म्हसे, ज्येष्ठ विश्वस्त श्री सीताराम खिलारी व श्री जयंत वाघ यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात कै. रावसाहेब म्हस्के यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. विद्यालयाचे प्राचार्य श्री व्ही. व्ही. जाधव यांनी प्रास्ताविकातून रावसाहेबांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि संस्थात्मक कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.

यानंतर विद्यार्थी –सेवक कल्याण संस्थेमार्फत दोनशे पेक्षा होतकरू व गरजू विद्यार्थ्यांना गणवेशांचे वितरण करण्यात आले. रावसाहेबांच्या पुण्यस्मरणानिमित्त हस्ताक्षर, निबंध,चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगत व भाषणातून रावसाहेबांच्या कार्याचा आढावा घेत त्यांच्या समाजाभिमुख विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. प्रमुख पाहुणे प्रा. टी. एन. दहातोंडे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले, रावसाहेब म्हस्के यांचे चरित्र आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे. शिक्षण, सहकार आणि समाजकारण या तिन्ही क्षेत्रांत त्यांनी केलेले कार्य आजही प्रेरणा देणारे आहे. त्यांच्या कार्याचा आदर्श प्रत्येक विद्यार्थ्याने व युवकाने डोळ्यांसमोर ठेवावा.असे सांगत त्यांनी रावसाहेबांच्या अनेक आठवणींना उजाळा दिला.

संस्थेचे अध्यक्ष श्री रा. ह. दरे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, रावसाहेबांनी शिक्षण, सहकार आणि राजकीय क्षेत्रात केलेले कार्य आजही समाजाला नवी ऊर्जा देणारे आहे. त्यांच्या विचारांचा वारसा जतन करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. अध्यक्षीय समारोपात श्री मुकेश मुळे यांनी रावसाहेबांचे कार्य समाजाभिमुख, दूरदर्शी व सर्वसामान्यांच्या विकासासाठी समर्पित असल्याचे सांगितले. समाजहितासाठी त्यांनी केलेल्या कार्याची प्रेरणा प्रत्येकाने घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री रवींद्र देवढे यांनी केले, तर सौ. वैशाली दारकुंडे यांनी आभार मानले. यावेळी उपप्राचार्य श्री दादासाहेब वांढेकर, उपमुख्याध्यापक श्री पवार बी. एम., पर्यवेक्षक श्री म्हस्के डी. सी., श्री सोनवणे एस. जी., सौ. मरकड व्ही. के., शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रावसाहेबांच्या कार्याचा गौरव करणारा हा प्रेरणादायी कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# बागुलू पंडुगू उत्साहात; श्रमिकनगरमध्ये पोशम्मा तल्ली व लचमम्मा तल्ली देवींच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी

**पोशम्मा तल्ली व लचमम्मा तल्ली देवींच्या चरणी आरोग्य, समृद्धी व सुख–शांतीसाठी साकडे यात्रा उत्सवात पोतराजांसह महिलांचा डोक्यावर बोणालू (कलश) घेऊन उत्स्फूर्त सहभाग**





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पद्मशाली समाजाचा पारंपरिक बागुलू पंडुगू (बागेचा सण) श्रमिकनगर, सावेडी येथे शुक्रवारी अत्यंत भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. श्रमिकनगर येथील शितळादेवी (पोशम्मा तल्ली) आणि लक्ष्मीमाता (लचमम्मा तल्ली) या दोन्ही मंदिरांमध्ये पहाटेपासूनच देवीच्या दर्शनासाठी, पूजा–अर्चेसाठी व पारंपरिक नैवेद्य अर्पण करण्यासाठी पद्मशाली समाजातील महिला भगिनींसह भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

या पारंपरिक यात्रा उत्सवाचे आयोजन श्री श्रमिक बालाजी सामाजिक संस्था ट्रस्ट यांच्या वतीने करण्यात आले होते. ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी यात्रेचे नियोजन व व्यवस्था उत्तम प्रकारे सांभाळल्यामुळे संपूर्ण धार्मिक सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

यात्रा उत्सवानिमित्त पोतराजांच्या उपस्थितीत महिलांनी डोक्यावर आकर्षक सजविलेले बोणालू (कलश) घेऊन ढोल–ताशे आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात परिसरातून भव्य मिरवणूक काढली. अनेक महिला भगिनींनी आपल्या नवसपूर्तीसाठी डोक्यावर बोणालू वाहून यात्रेत सहभाग घेतला. संपूर्ण परिसर जयघोषाने आणि भक्तिरसाने दुमदुमून गेला होता.

या यात्रेत श्रमिकनगर, सावेडी परिसरातील पद्मशाली समाजाबरोबरच सर्व समाजातील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. महिला, पुरुष, युवक आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याने सामाजिक ऐक्याचे सुंदर दर्शन घडले.

बागुलू पंडुगू हा पद्मशाली समाजाचा पारंपरिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाचा सण असून तो दरवर्षी आषाढ शुद्ध पौर्णिमेनंतर येणाऱ्या शुक्रवारी साजरा केला जातो. या दिवशी पोशम्मा तल्ली आणि लचमम्मा तल्ली देवीची विधिवत पूजा करून समाजातील सर्वांना उत्तम आरोग्य लाभावे, रोगराईपासून संरक्षण मिळावे, संतुलित पर्जन्यवृष्टी व्हावी, शेती समृद्ध राहावी तसेच समाजात सुख, शांती आणि समृद्धी नांदावी, अशी प्रार्थना केली जाते. देवीला गोड पुरी, मेथीची भाजी, दही, हळद टाकलेला भात, नारळ, फुटाणे, लिंबाची पाने, ओवा आणि थंड पाणी असा पारंपरिक नैवेद्य अर्पण करण्याची परंपरा आजही श्रद्धेने जपली जात आहे.

दिवसभर दोन्ही मंदिर परिसरात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होती. पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या महिला भगिनींनी भक्तिभावाने देवीची पूजा करून कुटुंबाच्या सुख–समृद्धीसाठी प्रार्थना केली. श्रद्धा, परंपरा, संस्कृती आणि सामाजिक एकात्मतेचे दर्शन घडविणारा बागुलू पंडुगू उत्सव यंदाही श्रमिकनगर परिसरात मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

# भिंगारच्या शुक्लेश्वर स्मशानभूमीच्या दुरुस्तीला सुरुवात

**बोरुडे यांच्या आंदोलनाच्या इशाऱ्याची दखल**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भिंगार येथील ऐतिहासिक शुक्लेश्वर मंदिर परिसरातील स्मशानभूमीच्या अत्यंत दयनीय अवस्थेविरोधात सामाजिक कार्यकर्ते जालिंदर बोरुडे यांनी आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर छावणी प्रशासनाने तातडीने दखल घेत दुरुस्तीची कामे सुरू केली आहेत. जीर्ण झालेले पत्र्याचे शेड, तुटलेल्या जाळ्या, पडझड झालेला प्रवेशद्वार आणि अन्य सुविधांची दुरुस्ती मंगळवार (दि. २८ जुलै) पासून सुरू करण्यात आली आहे. मात्र, केवळ तात्पुरत्या दुरुस्तींवर समाधान न मानता, अहिल्यानगर शहरातील नालेगाव येथील अमरधामच्या धर्तीवर आधुनिक आणि सर्व सुविधांनी सुसज्ज आरसीसी स्मशानभूमी उभारण्याची मागणी बोरुडे यांनी केली आहे.

भिंगार येथील शुक्लेश्वर मंदिर परिसरातील ही स्मशानभूमी भिंगारसह पंचक्रोशी आणि नागरदेवळे उपनगरातील हजारो नागरिकांच्या अंतिम संस्कारासाठी महत्त्वाचे केंद्र आहे. दररोज अनेक अंत्ययात्रा येथे येत असतात. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून या स्मशानभूमीची अवस्था अत्यंत बिकट झाली होती. अंत्यविधीसाठी उभारण्यात आलेले पत्र्याचे शेड पूर्णपणे जीर्ण झाले होते. अनेक ठिकाणी मोठमोठी भगदाडे पडल्याने पावसाळ्यात शेडमधून मोठ्या प्रमाणात पाणी गळत होते. परिणामी, दुःखद प्रसंगीही नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत होता.

पावसाच्या दिवसांत अंत्ययात्रा स्मशानभूमीत पोहोचल्यानंतरही पाऊस थांबेपर्यंत मृतदेहासह नातेवाईकांना प्रतीक्षा करावी लागत होती. अंत्यविधीची प्रक्रिया सुरळीत पार पाडणे अशक्य होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी होती. याशिवाय प्रवेशद्वाराचे लोखंडी गेट मोडकळीस आले होते, बसण्यासाठीचे ओटे वरील जाळ्या तुटलेल्या होत्या आणि परिसरात आवश्यक मूलभूत सुविधांचाही अभाव जाणवत होता.

या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते जालिंदर बोरुडे यांनी छावणी प्रशासनाचे लक्ष वेधून निधी उपलब्ध करून दुरुस्तीची कामे हाती घेण्याची मागणी केली होती. तसेच, वेळेत कारवाई न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला होता. त्यांच्या या भूमिकेनंतर छावणी प्रशासनाने त्वरित दखल घेत आवश्यक दुरुस्तीची कामे सुरू केली. सुरू असलेल्या कामांची पाहणीही जालिंदर बोरुडे यांनी प्रत्यक्ष जाऊन केली. बोरुडे यांनी प्रशासनाच्या तातडीच्या कारवाईचे स्वागत करताना, ही केवळ तात्पुरती उपाययोजना असल्याचे स्पष्ट केले. दरवर्षी पत्र्याचे शेड बदलणे किंवा डागडुजी करण्याऐवजी कायमस्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

**अहिल्यानगरच्या अमरधामच्या धर्तीवर आधुनिक स्मशानभूमीची मागणी**

भिंगारमधील शुक्लेश्वर स्मशानभूमी ही हजारो नागरिकांच्या अंतिम संस्कारासाठी अत्यंत महत्त्वाची असल्याने तिचा सर्वांगीण विकास होणे आवश्यक आहे. अहिल्यानगरच्या नालेगाव येथील अमरधामच्या धर्तीवर या ठिकाणी पूर्णपणे आरसीसी बांधकाम असलेली,

# फिरोदिया शिवाजियन्सच्या स्पर्धेत रिमझिम पावसात रंगला फुटबॉलचा थरार

**अशोकभाऊ फिरोदिया, आयकॉन आणि श्री साई स्कूलची दमदार कामगिरी; आठरे पाटील स्कूलचा ८–१ ने दणदणीत विजय । गोलांचा वर्षाव अन् काही सामने गोलशून्य**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी आयोजित आठव्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत गुरुवारी (दि. ३० जुलै) विविध वयोगटांतील अत्यंत रंगतदार आणि चुरशीचे सामने रंगले होते. अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर रिमझिम पावसाच्या सरी कोसळत असतानाही खेळाडूंनी उत्साहात खेळ करत प्रेक्षकांची मने जिंकली. काही सामन्यांत गोलांचा अक्षरशः पाऊस पडला, तर काही सामने अखेरपर्यंत गोलशून्य राहिल्याने शेवटच्या क्षणापर्यंत उत्कंठा कायम राहिली.

स्पर्धेच्या सकाळच्या सत्रात १४ वर्षांखालील मुलांच्या गटात अशोकभाऊ फिरोदिया स्कूल आणि ऑक्झिलियम कॉन्व्हेंट यांच्यात सामना रंगला. दोन्ही संघांनी आक्रमक खेळ करत गोल करण्यासाठी अनेक प्रयत्न केले. मात्र बचावफळीने उत्कृष्ट कामगिरी केल्याने एकाही संघाला गोल करता आला नाही. परिणामी हा सामना ०–० असा अनिर्णित राहिला.

१६ वर्षांखालील मुलांच्या गटात अशोकभाऊ फिरोदिया स्कूलने ऑक्झिलियम कॉन्व्हेंटवर ४–१ अशा फरकाने प्रभावी विजय मिळवला. सामन्याच्या तिसऱ्याच मिनिटाला आर्यन जाधवने गोल करत संघाचे खाते उघडले. त्यानंतर आयुष गाडलकरने २५, ३० आणि ५३ व्या मिनिटाला सलग तीन गोल करत हॅट्ट्रिकची नोंद केली. ऑक्झिलियम कॉन्व्हेंटला ५८ व्या मिनिटाला श्रीराम बल्लाळच्या सेल्फ गोलमुळे एकमेव गोल मिळाला. मात्र अशोकभाऊ फिरोदिया स्कूलच्या आक्रमक खेळापुढे त्यांना टिकाव धरता आला नाही.

१६ वर्षांखालील मुलींच्या गटात आयकॉन स्कूलने आर्मी (एम.आय.सी. अँड एस.) स्कूलवर २–० असा विजय मिळवला. आयकॉन स्कूलकडून वैष्णवी जगतापने १३ व्या मिनिटाला, तर गौरी आचार्याने २८ व्या मिनिटाला गोल करत संघाला भक्कम आघाडी मिळवून दिली. बचावफळीनेही तितकाच उत्कृष्ट खेळ करत आर्मी स्कूलला एकही गोल करू दिला नाही.

दुपारच्या सत्रात याच गटातील दुसऱ्या सामन्यात श्री साई इंग्लिश मिडीयम स्कूलने ऊर्जा गुरुकुलवर २–० असा विजय मिळवला. श्री साई स्कूलकडून हृदया तडकेने २३ व्या मिनिटाला, तर तनुजा गुंजाळने २८ व्या मिनिटाला गोल करत संघाचा विजय निश्चित केला. संपूर्ण सामन्यात श्री साई स्कूलने वर्चस्व राखत प्रतिस्पर्धी संघाला गोल करण्याची कोणतीही संधी दिली नाही.

१२ वर्षांखालील मुलांच्या गटात आठरे पाटील स्कूल आणि आयकॉन स्कूल यांच्यात झालेला सामना अत्यंत अटीतटीचा ठरला. दोन्ही संघांनी सातत्याने आक्रमणे केली, मात्र एकाही संघाला गोल करता आला नाही. त्यामुळे हा सामना ०–० असा अनिर्णित राहिला.

१४ वर्षांखालील मुलांच्या गटात मात्र आठरे पाटील स्कूलने आयकॉन स्कूलवर तब्बल ८–१ असा दणदणीत विजय मिळवत स्पर्धेतील सर्वात मोठ्या विजयांपैकी एक नोंदवला. अलख वराळने १७ व्या मिनिटाला पहिला गोल करत संघाचे खाते उघडले. त्यानंतर वेदांत ससे या खेळाडूने २०, २३, ४२, ४५ आणि ४८ व्या मिनिटाला तब्बल पाच गोल झळकावत अप्रतिम खेळाचे दर्शन घडवले. याशिवाय साई धामणेने २५ व्या मिनिटाला आणि कृष्णा घोरपडेने ३२ व्या मिनिटाला प्रत्येकी एक गोल केला. आयकॉन स्कूलला प्रतिक पवारच्या सेल्फ गोलमुळे एकमेव गोल मिळाला. आठरे पाटील स्कूलच्या वेगवान आणि आक्रमक खेळीपुढे आयकॉन स्कूलचा बचाव पूर्णपणे निष्प्रभ ठरला.

१६ वर्षांखालील मुलांच्या गटातील आठरे पाटील स्कूल आणि आयकॉन स्कूल यांच्यातील सामना देखील शेवटपर्यंत चुरशीचा झाला.

# सिस्पे प्रकरणात दुबईपासून दिल्लीपर्यंत पाठपुरावा

**पाठपुराव्यावरून श्रेयवाद; खा. नीलेश लंके यांनी पत्रकार परिषदेत मांडली भूमिका**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्ह्यातील बहुचर्चित सिस्पे आर्थिक घोटाळ्यातील मुख्य आरोपी राहुल शामराव काळोखे याच्या अटकेमागे आपण आणि आपल्या सहकाऱ्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचा दावा खासदार नीलेश लंके यांनी शुक्रवारी येथे केला.

महाराष्ट्र भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना लंके यांनी सांगितले की, सिस्पे घोटाळा उघडकीस आल्यानंतर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेऊन निवेदन दिले. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, संबंधित प्रशासकीय यंत्रणा तसेच पोलीस अधिकाऱ्यांकडेही पाठपुरावा करण्यात आला.

सप्टेंबर २०२५ मध्ये आरोपी दुबईमध्ये असल्याची माहिती मिळाल्यानंतर आपल्या सहकाऱ्यांची टीम तेथे पाठवून आरोपींचे वास्तव्य, व्यवसाय, ट्रेड लायसन्स, बँक खात्यांशी संबंधित माहिती, एमिरेट आयडी आणि अन्य कागदपत्रे संकलित करण्यात आली. ही माहिती तत्कालीन पोलीस अधीक्षक कार्यालयामार्फत पुढील तपासासाठी उपलब्ध करून देण्यात आल्याचा दावा त्यांनी केला.

९ फेब्रुवारी २०२६ रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन आरोपींविरोधात इंटरपोलमार्फत कारवाई तसेच केंद्रीय तपास यंत्रणांकडून चौकशी करण्याची मागणी केल्याचेही लंके यांनी सांगितले. त्यानंतर गृहमंत्रालय, परराष्ट्र मंत्रालय आणि संबंधित यंत्रणांकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आल्याचा दावाही त्यांनी केला. इंटरपोलची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर राहुल काळोखे याने दुबईहून बहरीन आणि नंतर फिजी येथे आश्रय घेतल्याची माहिती मिळाली. विविध यंत्रणांमधील समन्वयानंतर त्याला अटक करण्यात आल्याचा दावा लंके यांनी केला.

पत्रकार परिषदेत लंके यांनी आरोपींच्या कंपन्यांचे ट्रेड लायसन्स, व्यवसाय परवाने, बँक खात्यांशी संबंधित माहिती, वास्तव्याचे पुरावे आणि अन्य दस्तऐवज आपल्या ताब्यात असून, योग्य वेळी ते सार्वजनिक करण्यात येतील, असे सांगितले. सिस्पे घोटाळ्याच्या पाठपुराव्याचे श्रेय इतर लोकप्रतिनिधींकडून घेतले जात असल्याबाबत विचारले असता, सार्वजनिक वक्तव्ये आणि प्रत्यक्ष काम यात फरक असतो. श्रेयवादात अडकण्यापेक्षा फरार आरोपींना अटक करणे आणि पीडितांना न्याय मिळवून देणे अधिक महत्त्वाचे आहे, असे लंके यांनी नमूद केले.

तसेच, आरोपींना अटक होणे ही प्रक्रियेची सुरुवात असून, अंमलबजावणी संचालनालय (ईडी), केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) आणि अन्य यंत्रणांनी आरोपींच्या मालमत्ता व आर्थिक व्यवहारांचा शोध घेऊन आवश्यक कायदेशीर कारवाई करावी. जप्त करण्यात येणाऱ्या मालमत्तांमधून गुंतवणूकदारांचे पैसे परत मिळवून देण्यासाठी प्रयत्न व्हावेत, अशी मागणीही त्यांनी केली.

(पान १ वरून)

## प्रिन्सिपल विद्यार्थ्याला चावले...

धरून वरती उचलले आणि रागाच्या भरात त्याच्या उजव्या हाताला कडकडून चावा घेतला या घटनेत विद्यार्थ्यांच्या हाताला गंभीर दुखापत झाली. सदर घटना विद्यार्थ्यांनी वडिलांना सांगितली. या संदर्भात त्यांनी संस्थेकडे विचारणा केली असता प्रिन्सिपल गौतम यांनी माफी मागितली तसेच पुन्हा अशी कृती माझ्या हातून घडणार नाही असे लेखी मी तुमच्या घरी घेऊन येतो असेही सांगितले मात्र घडलेली घटना गंभीर असल्याने सोनल शेळके यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात प्रिन्सिपल गौतम यांच्या विरोधात फिर्याद दिली आहे. नगर तालुका पोलिसांनी गुन्हा रजिस्टर नंबर ६५३ / २६ , जे जे ॲक्ट कलम ७५/११५/२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

या घटनेबाबत गांभीर्याने तपास करून नालंदा स्कूलचे प्रिन्सिपल गौतम यांना तात्काळ अटक करून कारवाई करावी अशी मागणी मुलाचे वडील सोनल अर्जुन शेळके यांनी केली आहे.

## दरोड्याच्या तयारीतील टोळी शिर्डी रेल्वेस्थानकाजवळून ताब्यात

(वय २६) या ७ जणांना ताब्यात घेतले. अमोल धोत्रे आणि बाबू धोत्रे हे दोन आरोपी फरार होण्यात यशस्वी झाले.

आरोपींच्या अंगझडतीत लोखंडी तलवार, दोन चाकू, कटर, कटावणी, मिरची पूड, मोबाईल आणि रोख रक्कम असा एकूण १७ हजार २० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस अंमलदार राहुल डोके यांच्या फिर्यादीवरून शिर्डी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ मधील दरोड्याच्या तयारीचे कलम आणि आर्म ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन व अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

## वेल्हाळे दरोडा प्रकरणी एलसीबीकडून मोक्कातील फरार आरोपीसह तिघे जेरबंद

करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे ३० जुलै रोजी शोध मोहीम राबवून मुख्य आरोपी अक्षय उंबऱ्या काळे (वय २६) व तेजस सगड्या काळे (वय १९) यांना वाघुंडे (ता. पारनेर) येथून ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान चोरीचे दागिने विकत घेणारा सोनार शैलेंद्र चंद्रकांत डहाळे (वय ५०, रा. पारनेर) यालाही तपासात सहकार्य न केल्याने अटक करण्यात आली.

या गुन्ह्यात सगड्या काळे, शरद काळे, आवेश भोसले आणि प्रथमेश भोसले हे चौघे फरार आहेत. मुख्य आरोपी अक्षय काळे याच्यावर अकोले, नाशिक आणि बेलवंडी येथे मोक्का आणि दरोड्याचे गंभीर गुन्हे दाखल असून तो फरार होता. या अटकेमुळे संगमनेर शहर व तालुका पोलीस ठाण्यातील दरोड्याचे गुन्हे उघडकीस आले आहेत. पुढील तपास संगमनेर शहर पोलीस करत आहेत.

## संभाजीनगर–अहिल्यानगर–पुणे महामार्ग सहापदरी करा

केंद्रेही या मार्गावर आहेत. त्यामुळे या महामार्गाचे सहापदरीकरण झाल्यास धार्मिक पर्यटन, उद्योग, शेतीमाल वाहतूक, गुंतवणूक, रोजगारनिर्मिती आणि ग्रामीण विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

बीराष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३–एफच्या संपूर्ण २२० किलोमीटर मार्गाचे सहापदरी सिमेंट–काँक्रीटीकरण, आवश्यक ठिकाणी फ्लायओव्हर उभारणी व इतर पूरक सुविधांच्या कामांना प्राधान्य देऊन तातडीने मंजुरी द्यावी, अशी मागणी खासदार निलेश लंके यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे. त्यांच्या या मागणीमुळे मराठवाडा, अहिल्यानगर आणि पुणे या तीन महत्त्वाच्या विभागांतील दळणवळण अधिक सुरक्षित, जलद आणि सक्षम होण्यास मदत होणार आहे.